## प्रकरण : ४

# निवासस्थान, कामाच्या ठिकाणची परिस्थिती
# आणि
# यंत्रमाग कामगारांचे आरोग्य

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

# प्रकरण : चौथे

# निवासस्थान, कामाच्या ठिकाणची परिस्थिती आणि यंत्रमाग कामगारांचे आरोग्य

---

**प्रस्तावना :**

प्रस्तुत प्रकरणात, कामगारांचे निवासस्थान तेथील भौतिक परिस्थिति तसेच यंत्रमाग कामगारांच्या कामाच्या ठिकाणची परिस्थिती, तेथील भौतिक पर्यावरण आणि कामगारांचे आरोग्य यामधील परस्परसंबंध जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत प्रकरणाची विभागणी दोन भागात करण्यात आली आहे. पहिल्या भागात, कामगारांचे निवासस्थान आणि तेथील भौतिक परिस्थितीचे वर्णन करण्यात आले आहे. तर दुसऱ्या भागात कामगारांच्या कामाच्या ठिकाणची परिस्थिती, तेथील भौतिक परिस्थितीचे वर्णन केले आहे. या बाबींचा कामगारांच्या आरोग्याशी काय आणि कसा संबंध आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**कामगारांचे निवासस्थान :**

कारखान्यामध्ये काम करणारे कामगार ज्या घरात राहतात तेथील परिस्थितीचा त्यांच्या आरोग्यावर, विचारांवर कार्यक्षमतेवर निश्चीतपणे परिणाम होतो. भारतातील बहुसंख्य औद्योगिक कामगारांची राहण्याच्या ठिकाणची स्थिती अत्यंत बिकट आहे. कामगार ज्या ठिकाणी राहतात त्या भागात पक्के रस्ते नसतात, सांडपाण्याची योग्य विल्हेवाट होत नाही. सार्वजनिक शौचालये व मुतारी यांचा अभाव असतो. पिण्याच्या पाण्याची, प्रकाशाची व्यवस्था नसते. राहण्याच्या जागेतील अस्वच्छतेचा कामगारांच्या व त्यांच्या कुटुंबियांवर विपरित परिणाम होतो. कामगारांची राहण्याच्या ठिकाणची स्थिती व त्यांचे आरोग्य या दोन्ही गोष्टी परस्परांशी निगडीत असून त्यांचा औद्योगिक कार्यक्षमतेवर परिणाम घडून येतो, असे सर्वसाधारण चित्र दिसून येते. या

पार्श्वभूमीवर प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या १५० कामगारांचे निवासस्थान, तेथील सोयी, सुविधा या बाबत मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण प्रस्तुत प्रकरणात करण्यात आले आहे.

### ४.१.१ कामगारांचे निवासस्थान शहराच्या कोणत्या भागात आहे?

प्रस्तुत अभ्यासात नमुना म्हणून निवडलेले १५० यंत्रमाग कामगार सोलापूर शहरातील कोणत्या भागात राहतात याचे वर्गीकरण सारणी क्रमांक ४.१.१ मध्ये सादर केले आहे.

**सारणी क्रमांक ४.१.१**

**कामगारांचे निवासस्थान**

| अ.क्र. | निवासस्थान | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | झोपडपट्टी | ५७ | ३८.००% |
| २ | कामगार वसाहत | १९ | १२.७% |
| ३ | मध्यम वर्गीय वसाहत | ७४ | ४९.३% |
| | एकूण | १५० | १००.००% |

वरील माहितीवरून असे दिसून येते की, नमुन्यातील जवळ-जवळ निम्मे (४९.३%) कामगार मध्यमवर्गीय वसाहतीत राहणारे कामगार होते. उर्वरितांमधील ५४ (३८.0%) कामगार झोपडपट्टीत तर उर्वरित १९ (१२.७%) कामगार वसाहतीत राहतात.

### ४.१.२ घर स्वत:च्या मालकीचे की भाडेतत्वावरील?

यंत्रमाग कामगारांचे निवासस्थान हे अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. स्वत:चे घर असणे हे प्रत्येक व्यक्तीचे स्वप्न असते. निवडलेल्या नमुन्यातील १५० कामगारांपैकी ९६ (६४.0%) कामगारांचे स्वत:चे घर आहे. उर्वरित ५४(३६.0 %) कामगार भाड्याच्या घरात राहतात.

## ४.१.३ कामगारांची घरे :

नमुन्यात निवडलेल्या यंत्रमाग कामगारांची घरे झोपडीवजा, कच्चे घर, पक्की घरे व आर.सी.सी.या प्रकारची आहेत. झोपडीवजा कच्च्या घराच्या बांधकामासाठी मोठ्या झाडांची फांदी,बांबू, पोती, प्लॅस्टिक कागद, पत्रा इत्यादींचा वापर केला आहे. पक्क्या घराच्या बांधकामासाठी फक्त पञ्याचाच वापर केलेला आहे. चारही बाजूने पत्रा व छतासाठी ही पत्र्याचाच वापर केला आहे. त्याला 'पञ्याच डबा' म्हणतात. छतासाठी कौलारूंचा ही वापर केला आहे. पूर्ण पक्क्या घरासाठी (आर.सी.सी.) सिमेंट, वाळू, विटा (सिमेंट, क्रॉक्रीटची) याचा वापर केला गेला आहे.

निवडलेल्या कामगारांच्या घराच्या प्रकारानुसार वर्गीकरण सारणी क्रमांक ४.१.३ मध्ये केले आहे.

**सारणी क्रमांक ४.१.३**

**घराचा प्रकार**

| अ.क्र. | घराचा प्रकार | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | झोपडीवजा कच्चे घर | १०० | ६६.६% |
| २ | पक्के घर | ४३ | २८.७% |
| ३ | आर.सी.सी. | ०७ | ०४.७% |
| | एकूण | १५० | १००.००% |

सारणी क्रमांक ४.१.३ वरून असे दिसून येते की, बुहतांशी कामगार (६६.६%) झोपडीवजा कच्च्या घरात राहतात. तर २८.७% कामगार हे पक्क्या घरात राहतात. मात्र पञ्याच्या डब्याला ते पक्के घर समजतात.आर.सी.सी. घरात ०४.७% कामगार राहतात.

**४.१.४ खोल्यांची संख्या किती आहे?**

नमुन्यात निवडलेल्या कामगारापैंकी ८५ (किंवा ५६.७%) कामगार एकाच खोलीत राहतात.३५.३% कामगार दोन खोल्यात तर, ७.३% कामगार तीन खोल्यांच्या घरात राहतात.

**४.१.५ घराला खिडक्या आहेत किंवा नाही?**

घरातील हवा बाहेर जाऊन बाहेरील शुद्ध हवा व प्रकाश घरात येण्यासाठी घराला खिडक्या असणे महत्त्वाचे असते. निवडलेल्या नमुन्यातील १५० कामगारांपैंकी ११५ (किंवा ७६.६%) कामगारांच्या खोलीत (घरात) स्वतंत्र खिडक्या आहेत. उर्वरित २३. %३ कामगारांच्या खोलीला खिडक्या नाहीत.

**४.१.६ स्वतंत्र शौचालये आहेत किंवा नाही?**

एकाही कामगाराच्या घरात कौंटुंबिक मालकीचे शौचालय नाही. निवडलेल्या नमुन्यावरून असे दिसून आले की, १५० कामगारापैकी ८२ (किंवा ५४.७%) कामगार हे शौचास उघड्या मैदानावरच बसतात. तर उर्वरित ४५.३% कामगारांनी महानगरपालिकेने बांधलेला शौचालयाचा ते वापर करतात, असे सांगितले.

**४.१.७ पिण्याचे स्वच्छ पाणी :**

कामगारांना पिण्याचे पाणी कोठून उपलब्ध होते या विषयी माहिती मिळविली असता निवडलेल्या नमुन्यातील १५० कामगारापैंकी १४८ (किंवा ९८.७%) कामगारांनी पिण्याचे पाणी बोअरवेल व सार्वजनिक नळ या माध्यमातून भरपूर प्रमाणात मात्र एक दिवसा आड पाणी उपलब्ध होते असे सांगितले.

**४.१.८ घरातील विजेची सोय :**

निवडलेल्या नमुन्यातील कामगारांना घरामध्ये वीजेची सोय आहे का? असा प्रश्न विचारला होता. कामगारांनी उत्तरादाखल दिलेल्या माहितीवरून स्पष्ट होते की, बहुतांश (८८.७%) कामगारांच्या घरामध्ये विजेची सोय आहे. तर ११.३ टक्के

कामगारांच्या घरामध्ये वीजेची सोय नाही. विजेची सोय नसलेल्या या उत्तरदात्यांच्या (कामगारांच्या) घरामध्ये प्रकाशासाठी रॉकेलच्या दिव्याचा वापर केला जातो.

**४.१.९ स्वयंपाक करण्याची साधने :**

निवडलेल्या नमुन्यातील १५० कामगारांना स्वयंपाक करण्यासाठी कशाचा वापर करता? असा प्रश्न विचारला होता. उत्तरादाखल कामगारांनी दिलेल्या माहितीवरून स्पष्ट होते की, बहुतांश कामगार ५४.७% गॅसचा स्वयंपाकासाठी वापर करतात. ३४.0% कामगार रॉकेलच्या स्टोव्हची तर ११.३% कामगार स्वयंपाकासाठी चुलीचा वापर करतात तसेच भुश्याच्या शेगडीचा वापर करतात.

**४.१.१0 रस्त्याची व्यवस्था :**

कामगार ज्या परिसरात राहतात त्या परिसरातील त्यांच्या घरासमोरील रस्ते कशा स्वरूपाचे आहेत याचे वर्गीकरण सारणी क्रमांक ४.१.१0 मध्ये केले आहे.

**सारणी क्रमांक ४.१.१0**

**रस्त्याच्या स्वरूपावरून केलेले वर्गीकरण**

| अ.क्र. | रस्त्याचे स्वरूप | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कच्चे रस्ते | १0२ | ६८.0% |
| २ | पक्के रस्ते | ४८ | १२.0% |
| | एकूण | १५0 | १00% |

सारणी क्रमांक ४.१.१0 वरून असे स्पष्ट होते की, नमुन्यातील बहुतांश ६८.0% कामगारांच्या घरासमोरील रस्ता हा कच्चा आहे. उर्वरित ३२% कामगारांच्या घरासमोरील रस्ते पक्के आहेत.

**४.१.११ ड्रेनेज व्यवस्था :**

नमुन्यातील निवडलेल्या बहुतांश ६६.७%कामगारांच्या घरासमोरील उघडी

गटारे आहेत. तर ३३.३% कामगारांच्या घरासमोरची गटारी ही बंदिस्त आहेत. उघड्या गटारांची महापालिकेकडून स्वच्छता होत नसून या गटारी तुंबलेल्या असतात. पावसाळ्यात तर या गटारी सतत तुंबल्ेल्याच असतात. उघडी गटारी, घराजवळ सांडपाणी घराशेजारीच साचून राहत असल्याने डासांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात असलेला दिसून येतो.

**४.१.१२ कचरा :**

यंत्रमाग कामगारांच्या निवासस्थानातील कचरा हा त्यांच्या समोरचा गंभीर प्रश्न आहे. कचऱ्याच्या योग्य विल्हेवाटीची व्यवस्था महापालिकेकडून होत नाही. कचरा कोंडाळ्यातील कचरा जेव्हा रस्त्यावर येतो तेव्हाच तेथील कचऱ्याचा उठाव महानगर पालिकेकडून होताना दिसून येतो.

नमुन्यातील बहुतांश ५२.७% कामगार कचरा कोंडाळ्यामध्ये कचरा टाकतात. उर्वरित ४१.३% कामगार मोकळ्या जागेत कचरा टाकतात. तर ६ टक्के कामगार हे घराच्या समोरच कचरा टाकतात. मोकळ्या जागेत पाहिजे तेथे कचरा टाकल्याने ठिकठिकाणी कचऱ्याचे मोठे ढीग साचून पडतात. या साठलेल्या कचऱ्यात प्रामुख्याने विडी कामगारांनी टाकून दिलेली विडीच्या पानाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. काही कामगार धुम्रपान करून विडीचे थोटके या कचऱ्यात टाकतात त्यामुळे तेथे आग लागण्याच्या धोका असतो. कचऱ्याची विल्हेवाट व्यवस्थित होत नसल्याने मोठ्या प्रमाणात कामगारांच्या निवासस्थानाजवळ दुर्गंधी पसरलेली असते. डास व माश्यांचे उपद्रव मोठया प्रमाणात झालेला असतो. या डासांच्या उपद्रवामुळे घरातील लहान मुलांना नेहमी सर्दी व ताप येण्याचे प्रमाण मोठे आहे. मोठ्या व्यक्तिनाही हिवतापाचा त्रास मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून आले.

**४.१.१३ डासांचा उपद्रव :**

निवडलेल्या नमुन्यातील सर्व कामगारांनी त्यांना डासांचा त्रास होत असल्याचे सांगितले. कामगारांच्या परिसरात सार्वजनिक स्वच्छतेचा अभाव, गटारांमध्ये

पाणी साठून राहणे, बंदिस्त गटारांचा अभाव, अस्वच्छ शौचालये व नियमित कचरा उठाव होत नसल्याने तेथे डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो तेथे एक ही घर डास व माश्या विरहित नाही.

वरील विवेचनावरून यंत्रमाग कामागरांच्या निवासस्थानाच्या परिस्थितीचे वर्णन खालील प्रमाणे थोडक्यात करता येईल. पुरेशा सार्वजनिक शौचालयांचा अभाव, कचऱ्याच्या नियमित उठावाचा अभाव, अस्वच्छ गटारी, परिसरातील अस्वच्छता यामुळे पर्यावरणीय स्थिती वाईट आहे. दारिद्र्याशी लढणाऱ्या कामगारांना विविध रोगांशी झगडावे लागत आहे.

नमुन्यात निवडलेल्या १५० कामगारापैंकी बहुतांश ५६.७% कामगार एक खोली असलेल्या घरामध्ये राहतात. या खोलीचा वापर जेवण करण्यासाठी, झोपण्यसाठी, वस्तु ठेवण्यासाठी, इतर सर्व गरजा भागविण्यासाठी केला जातो. म्हणजेच एक खोलीचा वापर स्वयंपाक, बैठक, स्नानगृह यासाठी वापर केला जातो. खोली (घर) अस्वच्छ असल्याने एक प्रकारची दुर्गंधी येते या घरात फरशा नसल्याने शेण आदिने सारवलेल्या असतात. निवडलेल्या कामगारांच्या कुटुंबामध्ये सरासरी पाच व्यक्ती आहेत. त्यामुळे या घरात गर्दी असते. स्वयंपाकासाठी चुलीचा व भुश्याच्या शेगडीचा वापर असल्यने घर धुराने भरलेले असते. घरात ठिकठिकाणी जळमटे दिसतात. खिडक्या आहेत पण छोट्या असल्याने पुरेशा प्रमाणात घरात प्रकाश येत नाही. पावसाळ्यात या घरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी असते. कपडे घरातच वाळवत असल्याने ही दुर्गंधी अधिक उग्र असते.

## विभाग दुसरा : कामगारांच्या कामाच्या ठिकाणची परिस्थिती

कोणत्याही उद्योग व्यवसायातील कामगारांची काम करण्याची स्थिती, कामाचे तास, कामाच्या पाळया ( शिफ्ट ) कामगारांच्या सोई-सवलती, वायुविजनसाठी मोकळी जागा, स्वच्छ पाणी पुरवठा, स्वच्छ प्रकाश, या बाबतीतील परिस्थितीचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिमाण कारखान्यातील वातावरणावर व उत्पादनावर तसेच कामगारांच्या आरोग्यावरही होत असतो. वरील सर्व बाबींचा कामगारांच्या आरोग्याशी काय आणि कसा संबध आहे. हे जाणून घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत अभ्यासात करण्यात आला आहे.

### ४.२.१ कामाचे तास :

'काम करण्याची स्थिती' या संज्ञेमध्ये 'कामाचे तास' ही महत्वाची बाब आहे. कामाचे तास नियमानुसार योग्य असणे ही बाब कामगार व कारखानदार यांच्या दृष्टिने महत्वाचा प्रश्न आहे. भारतात कामाचे तास नियंत्रित करण्यासाठी भारतीय कारखाना व महाराष्ट्र कारखाने कायदा १९६३ मध्ये आवश्यक त्या तरतूदी केल्या आहेत. भारतीय कारखाना कायद्यातील कलम ५१, ५४, ५५, ५६, आणि ५७ मध्ये कामगारांच्या कामाच्या तासाविषयी तरतुदींचे विवरण दिले आहे. त्यातील महत्वाच्या तरतुदी पुढील प्रमाणे...

१. कारखान्यातील प्रौढ कामगाराकडून कोणत्याही सप्ताहात ४८ तासापेक्षा जास्त तास काम करून घेतले जाणार नाही.

२. १९४८ च्या कायद्यानुसार कामाच्या दैनंदिन तासावर मर्यादा घालण्यात आली आहे. प्रौढ कामगाराकडून कोणत्याही दिवशी ९ तासापेक्षा जास्त वेळ काम करून घेतले जाणार नाही.

३. प्रत्येक पाच तासानंतर कामगारांना अर्ध्या तासाची विश्रांती घेता येईल अशी व्यवस्था हवी.

४. प्रौढ कामगार कोणत्याही दिवशी ९ तासापेक्षा जास्त आणि कोणत्याही सप्ताहात ४८ तासापेक्षा अधिक वेळा काम करीत असेल तर जास्तीचा वेळ केलेल्या कामाबद्दल त्याला नेहमीच्या मजुरीच्या दुप्पटीने मजुरी मिळविण्याचा अधिकार आहे.

५. स्त्री कामगाराकडून रात्रौ ९ ते पहाटे ५ वा ३० मी. पर्यंत कोणत्याही कारखान्यात काम करून घेण्यावर कायदा १९४८ मध्ये प्रतिबंध घालण्यात आला आहे.

निवडलेल्या नमुन्यातील १० यंत्रमाग करखान्यात कामाच्या तासा संबधीच्या कामगारांच्या मुलाखती घेऊन माहिती घेण्यात आली. उपलब्ध माहितीवरून खालीलप्रमाणे वस्तुस्थिती दिसून आली.

### ४.२.१ कामाचे तास व मोबदला :

१. नमुन्यातील सर्वच (100%) कामगारांना ८ तास काम करावे लागते.

२. सर्व कामगारांना जेवण्यासाठी एक तासाची सुट्टी देण्यात येते.

३. काही वेळा काम जास्त असेल तरच फक्त पुरूष कामगार रात्रपाळीचे काम करतात. व त्यांना त्या वेळेची मजुरी ही दुप्पटीने मिळते.

४. बहुतांशी ठिकाणी एकाच पाळीत ( शिफ्ट ) काम चालते. स्त्री कामगारांना वरील सर्व नियम लागू आहेत. मात्र रात्रपाळीचे काम स्त्री कामगारांना नाही.

### ४.२.२ कामाचे स्वरूप : कायम किंवा हंगामी (तात्पुरते) स्वरूपाचे

नमुन्यात निवडलेले बहुतांश (९३.३% ) कामगार हे सेवेत कायम झालेले होते. फक्त १ कामगार हंगामी (तात्पुरते ) होता.

### ४.२.३ सेवेची नोंद :

नमुन्यात निवडलेल्या कामगारांना सेवेच्या नोंदी बाबत प्रश्न विचारला असता सर्वच ( १००% ) कामगारांनी उत्तरा दाखल 'सेवेची नोंद ठेवण्यात येते असे सांगीतले. कामगारांच्या येण्याच्या, कामांविषयी, व जाण्याच्या वेळे संबधी नोंदी ठेवतात असे निरीक्षणातून आढळले.

### ४.२.४ काम करीत असलेल्या मशिनचे प्रकार (स्वरूप)

नमुन्यात निवडलेल्या कामगारांना काम करीत असलेल्या मशिन चे स्वरूप कसे आहे? असा प्रश्न विचारला असता. बहूतांश (९४.७%) कामगारांनी जुनी मशिन्स असल्याचे सांगितले उर्वरित (५.३ %) कामगारांनी मशिन नविन असल्याचे सांगितले मात्र निरीक्षणात सर्वच मशिने जुनीच असल्याचे दिसून आले.

### ४.२.५ स्त्री-पुरूष स्वतंत्र विभाग :

नमुन्यात निवडलेल्या कामगारांना स्त्री कामगार आणि पुरूष कामगार यांच्यासाठी स्वतंत्र विभाग आहे काय? असा प्रश्न विचारला असता सर्वच ( १00% ) कामगार यांनी स्वतंत्र विभाग असल्याचे सांगितले. प्रत्यक्ष निरिक्षणावरून देखील असेच दिसून आले आहे.

### ४.२.६ पंख्याची सोय :

नमुन्यातील निवडलेल्या कामगारांना पंख्याच्या व्यवस्थेबाबत प्रश्न विचारला असता, उत्तरादाखल सर्वच (१५0) कामगारांनी पंख्यांची व्यवस्था नाही असे सांगितले त्याचे प्रमुख कारण असे की, कारखान्यात काम करीत असताना कापसाचे बारीक तंतू हवेत उडतात व पंख्यांच्या हवेने हे कण मोठया प्रमाणात कारखान्यात पसरतात व अशा पसरलेल्या कणांचा कामगारांना कामात अडथळा निर्माण होतो.

### ४.२.७ खिडक्या :

निरीक्षणातून कारखान्यात मोठया खिडक्या असल्याचे स्पष्ट दिसून आले.

### ४.२.८ स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था :

कारखाना नियमातील कलम १८ व महाराष्ट्र कारखाने अधिनियम १९६३ मधील कलम १९, ४0, ४१, ४२, ४३, ४४, मध्ये कोणत्याही कारखान्यात स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी आवश्यक नियमाचे स्पष्टीकरण केले आहे. नमुन्यात निवडलेल्या १0 यंत्रमाग कारखान्यात कामगारासाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था चांगली आहे.

### ४.२.९ भरपूर प्रकाशाची व्यवस्था :

नमुन्यात निवडलेल्या १० यंत्रमाग कारखान्यात कामगारांना काम करताना प्रकाशासाठी मोठया प्रमाणात खिडक्यांची वायुजिवन व्यवस्था दिसून आली प्रत्येक विभागात दोन ते तीन मोठया आकाराच्या खिडक्या आहेत, असे दिसून आले.

### ४.२.१० शौचालये व मुतारी :

भारतीय कारखाना अधिनियमातील कलम १९ व महाराष्ट्र करखाने अधिनियम १९६३ मधील ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५० आणि ५१ अन्वये प्रत्येक कारखान्यात पुरेशा प्रमाणात आणि प्रत्येक कामगारांच्या दृष्टीने सोयीस्कर ठरेल अशा ठिकाणी विशिष्ट पध्दतीची शौचालये व मुताऱ्या यांची योग्य व्यवस्था असली पाहेजे. शौचालये व मुताऱ्या स्वच्छ असावीत, असेही म्हटले गेले आहे. पुरेसा प्रकाश व हवा खेळती असावी.

नमुन्यात निवडलेल्या १० यंत्रमाग कारखान्यात शौचालये व मुताऱ्या आहेत. मात्र स्त्री कामगार व पुरूष कामगारासाठी स्वतंत्र शौचालये व मुताऱ्या न्व्हत्या असे निरीक्षणातून दिसून आले.

### ४.२.११ कामगारांचे आजार :

यंत्रमाग कारखान्यामध्ये विविध प्रकारच्या प्रक्रिया कामगारा मार्फत होत असतात. यंत्रमाग कारखान्यातील परिस्थितीमुळे काम करताना तेथील वातावरणाचा त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. सोलापुरातील यंत्रमाग करखान्यातील परिस्थितीमुळे काम करताना तेथील वातावरणाचा त्यांच्या आरोग्यावर विपरित परिणाम घडून येत आहे काय? काही कामगारांना वारंवार तर काही कामगारांना कायमस्वरूपी आजार जडले आहेत काय? यासंबधीची माहिती या अभ्यासात करून घेण्यात आली.

नमुन्यातील निवडलेल्या १५० कामगारांना कारखान्यातील वातावरणामुळे कोणता आजार झाला आहे ? या प्रश्नाचे उत्तर देता आले नाही, मात्र काम करून घरी गेल्यावर कोणत्या प्रकारचा त्रास होतो ? या बाबत कामगारांनी मोकळेपणाने उत्तरे

दिली. कामाच्या परिस्थितीमुळे ज्या कामगारांना लहान-मोठया आजारांना तोंड द्यावे लागते त्याचे वर्गीकरण सारणी क्रमांक ४.२.११ मध्ये केले आहे.

**सारणी क्रमांक ४.२.११**

**कामगारांच्या आजाराच्या स्वरूपावरून केलेले वर्गीकरण**

| अ.क्र. | कामगारांचे आजार | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सापेक्षत: कमी गंभीर आजार | ८३ | ५५.३ % |
| २ | श्वसन रोग (दमा) | १९ | १२.७ % |
| ३ | त्वचा रोग | ०३ | ०२.० % |
| ४ | कोणतेच आजार नाही | ४५ | ३०.० % |
|  | एकूण | १५० | १००.०० % |

सारणी क्रमांक ४.२.११ वरील माहिती वरून असे स्पष्ट होते की, बहुतांशी (५५.३%) कामगार अंगदुखी, डोके दुखी, ताप येणे, सर्दी, पाय दुखणे, कंबर दुखणे, डोळे चुरचुरणे, चक्कर येणे, अशक्तपणा येणे, ( वाटणे ) इत्यादी सापेक्षत: कमी गंभीर आजारांनी त्रस्त असल्याचे दिसून आले १२.७ % कामगारांना श्वसनाचा (दमा) त्रास आहे. तर २ टक्के कामगारांना त्वचारोग झाला आहे. वरील सर्व आजारांचा कामगारांच्या कामाच्या व राहण्याच्या ठिकाणच्या परिस्थितीशी संबध आहे असे म्हणता येईल.

### ४.२.१२ कामगारांची व्यसनाधीनता :

नमुन्यातील निवडलेल्या कामगारांना कोणते ना कोणते व्यसन आहेच. कामगारांच्या व्यसनाच्या स्वरूपाचे वर्गीकरण सारणी कमांक ४.२.१२ मध्ये केले आहे.

### सारणी क्रमांक ४.२.१२

### कामगारांच्या व्यसनाच्या स्वरूपावरून केलेले वर्गीकरण

| अ.क्र. | व्यसन स्वरूप | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पान तंबाखू | ७४ | ४९.३ % |
| २ | मद्यपान | ५४ | ३६.0 % |
| ३ | धुम्रपान, जुगार, मटका | २0 | १३.३ % |
| ४ | कोणतेच व्यसन नाही | 0२ | 0१.४ % |
| | एकूण | १५0 | १00.00 % |

सारणी क्रमांक ४.२.१२ मधील आकडेवारी वरून असे स्पष्ट होते की, केवळ दोन कामगार वगळता अन्य सर्वांना कोणते ना कोणते व्यसन होतेच. बहुतांश (४९.३%) कामगारांना पान तंबाखू चे व्यसन आहे. तर ३६.0% कामगारांना मद्यपानाचे व्यसन आहे तर उर्वरित १३.३ % कामगारांना धुम्रपान व जुगार मटक्याचे व्यसन आहे.

## ४.२.१३ कामगारांच्या आरोग्यावर कारखान्यातील परिस्थितीमुळे होणारे परिणाम :

यंत्रमाग कारखान्यामध्ये विविध प्रकारच्या प्रक्रिया कामगारांमार्फत होत असतात त्यामुळे तेथील वातावरणाचा त्यांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होतो. सायझिंग प्रक्रियेसाठी जे गंजीमिश्रण वापरले जाते त्या पदार्थाची हाताळणी उघडया हाताने करत असतात. त्यातून कामगारात त्वचा रोगाचे प्रमाण वाढत आहे. वॉर्पिंग यंत्राच्या ठिकाणी मोठया प्रमाणात कापसाचे बारीक कण हवेत उडतात. वॉर्पिंग कामगार यंत्राच्या जवळ असल्याने त्यांना या कणांचा अधिक त्रास होतो. हवेत उडणारे कण कामगारांच्या श्वसनाव्दारे शरीरात प्रवेश करतात निवडलेल्या कारखान्यामध्ये एकाही कारखान्यात

बारीक कणापासून संरक्षण देण्यासाठी मुखवटे उपलब्ध नसल्याचे दिसून आले. कामगारांना सुताने भरलेली मोळी किंवा मोकळी बीम उचलण्यासाठी यंत्रचलीत व्यवस्था कोठेही आढळली नाही. कामगारच भरलेली बीम उचलत असतात त्यामुळे अंगदुखी, पाठदुखी, कंबरदुखी, या अजाराचे प्रमाण वाढले आहे.

काही कामगारांना सतत प्रखर उष्णतेच्या वातावरणात काम करावे लागते. बॉयलरच्या ठिकाणी उष्णतेचे प्रमाण अधिक असल्याने त्याचा त्रास या कामगारांना होतो. बॉयलरमध्ये एकसारखा इंधन पुरवठा करीत असताना प्रखर ज्वलनाचा डोळयांना मोठया प्रमाणात त्रास होतो. यापासून संरक्षणासाठी एकाही कारखान्यात गॉगलचा वापर करताना कामगार आढळत नाही कारखान्यात यंत्रमागाचा एकसारखा खड्खड् असा आवाज येत असतो. या आवाजात कामगारांना आठ तास उभे राहून काम करावे लागते. त्यामुळे त्या कामगारांची ऐकण्याची क्षमता कमी झाली आहे. बहिरेपणाची लक्षणे मोठया प्रमाणात दिसतात यंत्राच्या घर्षणाने कारखान्यातील वातावरण अतिशय उष्ण होते. या उष्ण हवेमुळे कापड निर्मितीवर त्याचा विपरीत परिणाम होतो. तो होऊ नये म्हणून कारखान्यात कृत्रिम पाण्याचे फवारे बसविलेले असतात. फवाऱ्याचे पाणी एकसारखे कामगारांच्या डोक्यावर पडत असल्याने डोके दुखी, सर्दी, ताप यासारखे कायमस्वरूपी आजार सतावत आहेत.

ब्लो रूममध्ये जिथे कॉटन ब्लेड्स उघडून स्वच्छ केले जातात. तिथे धुळी व कणांचे प्रमाण खूप मोठया प्रमाणात असते. येथे कॉटन (सूत) मधील अशुध्द घटक वेगळे करण्यासाठी ते जोरदार बडविले जाते. नंतर कार्डिंग विभागात कॉटनच्या लॅप्स मशीनवर घेऊन त्यातील धूळ कचरा वेगळे केले जाते या प्रक्रियेमध्ये कार्डिग विभागात खुप मोठया प्रमाणात कॉटनमधील धूळ मुक्त होते. त्या पुढील प्रक्रिया स्पिनिंग शेड मध्ये होते. येथे देखील धुळीचे प्रमाण जास्त असते धुलीकणाची अतितीव्रता श्वसन रोगास (दमा) कारणीभूत ठरते. क्लोरीन वायूचे बुडबुडे कॉस्टीक सोडयाच्या द्रावणात मिसळून जे सोडियम हायपोक्लोराईट हया ब्लिचिंग घटकाच्या निर्माण प्रक्रियेत वापरले

जाते. क्लोरीनच्या अति संसर्गामुळे जळण्यापासून ते प्राणहानी पर्यंत धोके निर्माण होतात. क्रेसॉलस किंवा क्रेसिलीक ॲसिड जे वेटिंग प्रक्रियेत घटक म्हणून वापरले जाते त्याच्या सततच्या किंवा अतिशय संबधामुळे मृत्यू ओढवू शकतो.

यंत्रमाग कारखान्यात ध्वनीप्रमाण मर्यादेपेक्षा (म्हणजे ८५ ते ९० डेसिबल) पेक्षा जास्त असते. त्यामुळे कायमचा बहिरेपणा येऊ शकतो.

कार्डरूम यंत्रसामग्री मध्ये कॉटन फायबरची विभागणी व मिसळणी केली जाते या यंत्रसामग्रीमध्ये रोलर ड्रम किंवा कॉनव्हॉय पट्टा ज्याला टोकदार खिळे असतात. हे कॉटन स्पिन यार्न मध्ये भरण्या अगोदर कॉटन पसरण्याचे काम करतात. हे टोकदार रोलर्स त्वचा, सांधे, रक्तवाहीन्या, मज्जातंतू, शीर यांना इजा पोहचवतात.

कॅलेंडर मशीन पासून जिथे स्टार्चींग व गरम रोलर्स मधून ड्राय केल्यानंतर पुरविले जाते या फिरत्या रोलर्स आणि मशीनच्या इत्तर रोल्स मध्ये हात व बोटे खेचून घेऊन मोठया प्रमाणात इजा होतात याची तिव्रता फक्त रोलर्सच्या तापमानावर अवलंबून नसून तेथे तापमान ११०-१२० C असते. जेव्हा रोलर्स मधील फट (अंतर) कमी असते तेव्हा बोटे आणि हात चिरडले जातात. व त्यानंतर भाजून निघतात ब्लिचिंग विभागात कामगारांचे पाय सतत ओल्या फरशीवर असतात ज्यामुळे त्वचारोग उद्भवतात.

**समारोप :**

यंत्रमाग कारखान्यातील कामगारांच्या आरोग्यावर कारखान्यातील परिस्थितीमुळे विपरीत परिणाम होतात. यापासूनच कामगार वेगवेगळया आजारांना बळी पडतात. काही कामगारांना कायम तर काही कामगारांना तात्पुरत्या पण वारंवार उद्भवणाऱ्या आजारांना सामोरे जावे लागते. बहुसंख्य कामगारांना श्वसन (दमा), बहिरेपणा, हात, बोटे भाजणे, कापणे, अंगदुखी, डोकेदूखी, ताप, सर्दी, चक्कर येणे, अशक्तपणा वाटणे, कंबरदुखी इ सारख्या आजारांनी त्रासले आहेत.

Direct Relationship